# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २०५-२३** **दिनांक : - २८/०६/२०२३**

## संगीत (कार्डिफ) ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनेवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २६/०६/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, संगीत ऑर्केस्ट्रा बार (कार्डिफ) करुणालय निवास, महाजनवाडी, मिरा गावठाण, काशिमिरा या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडुन नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक/चालक, मॅनेजर, कॅशिअर, पुरुष सिंगर, वादक, स्टीवर्ड व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करुन नृत्य करण्यात भाग पाडत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने कायदेशीर बाबीची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक पाठवून सत्यता पडताळुन संगीत ऑर्केस्ट्रा बार (कार्डिफ), करुणालय निवास, महाजनवाडी, मिरा गावठाण, काशिमिरा या ठिकाणी पोलीस पथक व दोन पंचासह २३.४५ वा. छापा कारवाई केली असता वन नमुद आस्थापनामध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच ऑर्केस्ट्रा बारचे चालक, मॅनेजर कम कॅशियर, स्टीवर्ड, वेटर, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहीत करीत असताना मिळुन आल्याने नमुद ऑर्केस्ट्रा बार आस्थापनेचे मॅनेजर कम कॅशिअर-०१, स्टीवर्ड-०१, वेटर-०६, पुरुष सिंगर-१ व वादक-०१ असे एकुण १० इसमांना ताब्यात घेण्यात आले असुन पाहिजे आरोपीत मालक नामे राजाराम यमुना यादव, चालक ईश्वर शेट्टी, प्रसाद शेट्टी व राजेश कुंदर, पुर्ण नांव पत्ता माहीत नाही आणि तपासात निष्पन्न होणारे इतर चालक त्यांच्याविरुध्द पो.अंम. केशव शिंदे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणते गुन्हा रजि. क्र. ४५८/२०२३ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे दिनांक २७.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.अंम. केशव शिंदे, चेतनसिंग राजपुत, चा. पो.हवा. सम्राट गावडे, म.पोअंम. अश्विनी भिलारे, शितल जाधव यांनी केली आहे.

**----0000----**